# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दि. १०/०४/२०१७

## नक्षलवादयांकडून आदिवासीची हत्या

काल दिनांक ०९/०४/२०१७ रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोस्टे भामरागड हद्दीतील मौजा बेजूर गावचे रहिवासी लालसू कुंडी आत्राम, वय-४५ वर्ष यांची नक्षलवादयांनी हत्या केली.

लालसू आत्राम हे नगर पंचायत भामरागड येथे कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. नोकरीनिमीत्य ते भामरागड येथे वास्तव्यास होते. परंतु मौजा बेजुर येथे त्यांची शेती असल्याने ते अधुन-मधुन बेजुर येथे येत होते. काल गावामध्ये यात्रा सुरु असल्याने ते गावी आले होते. यात्रेच्या ठिकाणी रात्री ९ ते १० वा. च्या दरम्यान कार्यक्रमानिमीत्य गावकरी तसेच लालसु आत्राम हे उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतांना अचानाक ८ ते १० नक्षली कार्यक्रमामध्ये घुसले व त्यांनी कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेले लालसू आत्राम यांना कार्यक्रमातून उचलून नेले व गावाच्या बाहेर नेऊन त्यांना काठीने बेदम मारहाण करीत त्यांच्या डोक्यात दगड घालून त्यांची हत्या केली.

सदर परिसरात घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर नक्षल शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आलेली असून नक्षल्यांविरुध्द पोस्टे भामरागड येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.